Reviews of Literature
Impact Factor : 1.4716 (UIF)
Volume 2 , Issue 5 / Dec 2014 ISSN:-2347-2723

# मध्ययुगीन उत्तर भरतातील नगर रचना :–एक वास्तव

*डॉ. ज्ञानेश्वर शामराव कडव*

*इतिहास विभाग प्रमुख , ज. मु. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा.*

***प्रस्तावना :***

नगर रचना आधूनिक व्यवस्था आहे. मात्र मध्यकालीन भारतात नगरांच्या रचनेकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात होते. नगरांची रचना करतांना खालील बाबी आवश्यक समजल्या जात होत्या.

मध्युगीन कालखंडात प्रामुख्याने नगरे नदी काठी वसलेली होती. पाण्याची गरज भागविण्यासाठी नदी हे महत्वाचे साधन मानले जात होते. नदीकाठी नगर वसविले असल्यास पिण्याचे पाणी नागरिकांना सहजरितीने प्राप्त होत होतेच. पण जनावरांना आणि शेतीसाठी त्या पाण्याचा वापर करणे सुलभ जात होते. नदीकाठच्या विहीरीची पाण्याची पातळी ही कायम राहत असे. पाणी टंचाईची समस्या निर्माण होत नसे.

त्याचप्रमाणे नदीकाठच्या नगरांना थंड हवामानही प्राप्त होत असे. शेत जमीनीची सूपीकता नदीच्या पाण्यामुळे वाढत असे. त्यामूळे शेतीच्या उत्पन्नात वाढ घडून येत असल्याकारणाने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती प्रबळ बनत असे. ग्रामीण जनतेनलाच नव्हे तर शहरातील जनतेला पूरेसे धान्य प्राप्त होऊ शकत असे.

मध्ययुगीन कालखंडात नदीव्दारे व्यापारी मालाची ने आण केली जात असे. त्यामुळे नगरांना पाहिजे असलेला माल प्राप्त होत असे. एच. के. नकवी म्हणतात, ''नगरों का नदियो के समीप होने के कारण तथा नौगमयता के कारण मध्यकालमें नगरों की स्थिती का महत्व बढ़ गया था । नदियों के समीप बने होने के कारण इस समय के नगर समृध्द, परिपूर्ण और विकसित अवस्था में थे । नदी के किनारे होने से समुद्रिय आक्रमण कम होते थे, जिससे नगरों की सुरक्षा होती थी । जल परिवहन की समस्या का समाधान पूरा कर व्यापार में सहयोग देता था । भारतीय ग्रीष्म ऋतु में चलने वाली गरम हवाओं को परस्पर ठंडा रखता था । जल मार्ग से ही सबसे जादा माल का अवागमन होता था । मालों को नगर में पहुँचाचाने मे सहज कार्य करता था । स्थल मार्ग की अपेक्षा जलमार्ग के व्दारा व्यापार अधिक सुविधा जनक होता था ।[1] ते पूढे लिहितात, या नगरांमध्ये परस्पर नाविक संबंध प्रस्थापित झाले होते. वर्षभर ते जलमार्ग खूले राहत होते.

जनतेला पूरेशा प्रमाणात अन्न–धान्य उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणी नगर वसविले जात असे. नगराच्या आजू बाजूची जमीन सूपीक असणे गरजेचे होते. त्याशिवाय त्या जमिनीतून अन्न–धान्याचे पूरेसे उत्पादन करणे शक्य होणार नव्हते.

तसेच नगर प्रामूख्याने मुख्य रस्त्याशी सहजरितीने जोडली जाईल याकडेही लक्ष दिले जात असे. वाहतूक करणे, जाने येणे करणे सूलभ होईल अशा ठिकाणी नगर वसविण्याला प्राधान्य दिले जात असे. याविषयी राधेशाम लिहितात, ''नगर के जीवन के लिए व्यापक ढंग के व्यापारीक लेन–देण के लिए यह आवश्यक था की, वे मूख्य मार्गोपर स्थित हो और वे सभी साधन उपलब्ध हो जिससे नगर का विकास संभव हो ।''[2]

तर के. एम. अशफ म्हणतात, '' नगर की आबादी इस प्रकार कि हो वही शिल्पकारों, कलाकारो, मजुरो, समाज के अन्य वर्गी जैसे व्यापारियो, सराफो ईत्यादी को अपने से सम्बध रख सके और उन्हे जीवन यापन के सभी साधन प्रदान कर सके । नगर मे किसी न किसी उद्योग का होना आवश्यक था, जिससे नगरों का विकास हो सके ।[3]

याविषयी सर यदुनाथ सरकार लिहितात, ''एखाद्या वस्तीला तेव्हाच टाऊन म्हणून संबोधिले होते, जेथील बहूसंख्य जनता शेतीशिवाय दुसऱ्या व्यवसायाव्दारे स्वतःचा उदरनिर्वाह करित होती.[4]

अशाप्रकारे वरील बाबींची ज्या ठिकाणी पूर्तता करणे शक्य होत असे, त्याठिकाणी नगरे वसविली जात होती. अर्थात प्रत्यक्षात तत्कालीन साधनांचा अभ्यास केल्यास वरीलप्रमाणे सर्वच बाबींची पूर्तता ज्या ठिकाणी नगरे वसली आहेत त्या ठिकाणी झाल्याचे दिसून येत नाही. सर्वच नगरे नदीच्या जवळ किंवा मूख्य रस्त्यावर वसलेली नव्हती. सर्वच ठिकाणची जमीन पूर्णपणे सूपीक नव्हती. तरीपण या कालखंडातील बऱ्याच नगरांमध्ये आवश्यक सोयी उपलब्ध होत्या असे दिसून येते.

**या कालखंडातील नगर रचना खलील प्रमाणे होती :—**

नगररचने विषयी एच. के. नकवी लिहितात, ''नगरों को चारो तरफ से विशाल दिवार के व्दारा सुरक्षित किया जाता था । ये सुरक्षा के दृष्टीकोन से काफी महत्वपूर्ण मानात जाता था । जबकि किलों का निर्माण विभिन्न बाहरी आक्रमणों से रक्षा हेतु किया जाता था । किले, विभिन्न कार्यालय, कारखाने, रसोई घर, कर्मचारियों के आवास, पर्याप्त जल आपूर्ति एवं लम्बे समय तक मानवीय आवश्यकताओं हेतु खाद्य पदार्थो के संचयन में महत्वपूर्ण भूमीका निभाते थे ।[5] तर डब्ल्यु फोस्टर म्हणतात, ''सुरक्षेच्या दृष्टीने किल्याची निर्मीती आवश्यक होती. आगरा व लाहोर येथील किल्यांची निर्मीती यादृष्टीने महत्वाची होती. अकबराने त्या ठिकाणी सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या.''[6] ओ. पी. सिंह यांच्या मते ''उमराव वर्गाला किल्ल्यांमध्ये जागा न मिळाल्यास त्यांची निवासस्थाने किल्ल्यांच्या जवळ उभारली जात असत किंवा नदी जवळच्या प्रदेशात बांधली जात असत.[7]

तर डब्ल्यु. एच. मोरलॅन्ड याने लिहिले आहे की, ''भिन्न व्यवसाय करणाऱ्या वर्गाचे वेगवेगळे गड होते. व्यापारी, नोकरदार, कारगीर या वर्गातील लोक आपल्या गडांमध्ये वास्तव्य करित असत. लोहार गड, चीनी गल्ली, तेलीवाडा ही कारांगीराच्या वस्त्यांची गडांची नावे होती.''[8]

हे कारगीर एकत्र राहण्याची कारण मिंमासा करतांना एच. के. नकवी म्हणतात, ''परस्पर भाईचारा निर्माण व्हावा तसेच बाहेरील लुटांरूपासून संरक्षण करता यावे यासाठी हे कारागीर एकाच वस्तीत (गढ़) वास्तव्याला राहत असत.'' ते पूढे लिहितात, ''नगरांमध्ये असंख्य बाजार असल्यामूळे प्रत्येक वस्त्यांना (गढ़) दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या वस्तु सहजरित्या प्राप्त होत असत.''[9]

मात्र गरीब नागरीक नगरांच्या बाहेर निवास करीत होते. ओ. पी. सिंह यांनी म्हटल्या प्रमाणे, ''जशी लोकसंख्या वाढत असे गरीबांना नगरातील किल्ल्यांच्या दूर वास्तव्य करावे लागत असे. गरीबीमूळे त्यांना लूटण्याची भिती राहत नसे. गरीबीच त्यांची सुरक्षा होती.''[10]

एच. के. नकवी लिहतात, ''किल्ले, निवासस्थाने, मशीदी, बगीचे, बाजार व इतर सार्वजनिक इमारती आणि नगरांचे प्रमूख किल्ले त्यांच्या महत्वानुसार बांधले जात असत. उदा. मोठे बगीचे नगरांच्या मध्यभागी तयार केले जात नसत. कारण तसे करणे गैर सोयीचे ठरत होते.''[11]

ए. के. श्रीवास्तव म्हण्तात, ''नगर राजकिय, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टया संपन्न होते. 13 व्या शतकात ज्योवळी उत्तर भारतात सुल्तानशाहीची स्थापना झाली त्यावेळी तीन प्रकारची नगरे अस्तित्वात होती. प्रथम राजधानीची नगरे, दुसरे व्यापारी नगरे व तिसरे तिर्थस्थळ असलेली नगरे असे प्रकार होते. पैकी तिर्थस्थळे असलेल्या नगरांच्या स्वरूपात बदल झाले नाहीत. मात्र इतर दोन प्रकारच्या नगर रचनेत मुस्लीमांनी त्यांच्या गरजेनुसार बदल केलेत. मात्र नगरांचे जूने स्वरूप नष्ट झाले नाही.''[12]

**नगरांची स्थिती :—**

मध्यकालीन भारतातील नगरांच्या स्थिती विषयी इतिहासकार, लेखक व परकिय प्रवासी, व्यापारी यांनी माहिती दिली आहे. त्यातील प्रमुख माहिती खालील प्रमाणे —

डॉ. युसूफ हूसेन म्हणतात, ''भारतात नगरांचा विकास मध्यकालीन भारताच्या इतिहासातील अनन्य साधारण घटना होती. 15 व्या व 16 व्या शतकात आलेल्या परकियांनी भारतीय नगरांची प्रामुख्याने दिल्लीची तुलना लंडन, पॅरीस व इस्तम्बूल शहरांशी केलेली आहे. त्यांच्या मते अत्तमशच्या शासन काळापासून दिल्लीच्या विकासाला प्रारंभ झाला. मोगल राजवटी पर्यंत तो विकास सर्वोच्च स्तरापर्यंत पोहचला होता. दिल्ली व्यतिरिक्त लाहोर, श्रीनगर, आगरा ही नगरे विशेष विकसीत झाली. अकबराच्या काळात भारत भ्रमण केलेल्या रल्फ फिच याने लिहून ठेवले आहे की, ''आग्रा व फत्तेपूर सिक्री ही दोन मोठी नगरे आहेत. त्यातील प्रत्येक नगर लंडन पेक्षा मोठे आहे. आग्रा व फत्तेपूर सिक्री यातील अंतर 22 मैलांचे असून संपूर्ण रस्त्यामध्ये खाद्य पदार्थ व इतर वस्तुंचे बाजार आहेत. त्यामुळे मनुष्य शहरातचअसल्याचा भास होतो.''[13] मिर्जा हैदर श्रीनगरचे वर्णन करतांना म्हणतो, ''या शहरात देवदार वृक्षांनी तयार केलेल्या विशाल इमारती आहेत. यातील बहूतेक इमारती पाच मजली आहेत. बाहेरुन या इमारती सुंदर असल्यातरी आतील भाग सुंदर नाही. बाजार व रस्ते दगडांनी तयार केलेले आहेत.''[14] फादर मोन्सेरेट लाहोर नगराचे वर्णन करतांना लिहितात, ''आकार, लोकसंख्या, संम्पतीच्या बाबतीत हे नगर आशियात व यूरोपात अव्दितीय आहे. जगातील मोठया नगरां पैकी एक आहे. लोकसंख्या इतकी दाट आहे की, गल्लीतून जातांना एकमेकांचे खांदे परस्परांच्या खाद्यांना घासत असतात.''[15] शेवटी दिनेशचंद्र भारव्दाज सारांश रुपाने लिहितात, ''नगरों के उपरोक्त वर्णन से स्पष्ट हो जाता है की, मध्ययुगमें नगरों का वैभव अधिक सम्पन्नता के कारण कितना गौरव पूर्ण था ।''[16]

तत्कालीन साधनांवरुन तसेच इतिहासकारांच्या लिखानावरुन मध्यकालीन भारतीय नगरांच्या आंतरीक रचनेची कल्पना येते. शासकांचे राजमहाल किंवा सरंजामदार वर्गाची निवासस्थाने नदीकाठा नजिक विस्तृत जागेत बांधली जात असत.

आकाराने ती मोठी होती. किल्ल्यात मोठया संख्येत भवन बांधण्यात येत असत. या भवनांमध्ये शासक व अधिकारी वर्ग निवास करीत होते.

तिसरी बाब म्हणजे नगरांच्या बाहेरच्या भागात बांधण्यात येत असलेली मोठी भिंत होती. आक्रमणापासून नगराची सुरक्षितता व्हावी हा या भिंती मागचा उद्देश असावा. त्याचप्रमाणे नगराला मूख्य प्रवेशव्दार होते. येणाऱ्या–जाणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी किंवा प्रवेश नियंत्रीत करण्यासाठी त्याचा वापर केला जात असावा.

चवथी बाब प्रामुख्याने जाणवते ती म्हणजे सुनियोजीत रस्त्यांचा अभाव होय. शहजहानाबाद वगळल्यास नगरांमध्ये सुनियोजित रस्त्यांची कमतरता दिसते. अरुंद व अस्ताव्यस्त गल्ल्या दिसून येतात. नगरांमध्ये लोकसंख्या अधिक होती. वस्ती करणाऱ्यांची गर्दी दिसून येते. त्यात सातत्याने वाढझाल्याचेही निदर्शनास येते.

मात्र प्रत्येक नगरामध्ये किमान एक बाजारपेठ दिसून येते. सर्वसामान्यपणे मुख्य चौकात बाजारपेढ अस्तित्वात होती. या बाजारात वेगवेगळया प्रगकारचे सामान उदा. कपड़े, खाण्यापिण्याचे पदार्थ, लाकडी वस्तु उपलब्ध होत्या. निवास स्थनांच्या बांधकासाठी विटा, दगडांचा वापर केला जात असे. लहान घरे बांधण्यासाठी माती, लाकुड व भूसा वापरला जात असे. जरी परकिय प्रवाशांनी किंवा व्यापाऱ्यांनी मध्यकालीन भारतीय नगरांच्या संपन्नतेचे गुणगान केले असले तरी नगरांमध्ये धाणीचे तसेच अव्यवस्थतीत पणाचे प्रमाण अत्याधिक असल्याचे दिसून येते. सर यदुनाथ सरकारांनी यावर प्रकाश टाकलेला आहे. नगरांमध्ये मुलभूत सोयींचा अभाव होता. दक्षिण भारतातच्या तुलनेत उत्तर भारतातील नगर निर्धन होता. गरीबीचे प्रमाणही अधिक असल्याचे दिसून येते.

शेवटी वरील सर्व विवरणावरुन असे म्हण्ता येईल की, जरी विदेशी पर्यटकांनी किंवा इतरांनी मध्ययुगीन भरतातील नगरांना ते समृध्द, वैभवशाली असल्याचे म्हटले असले तरी प्रत्यक्षात सर्वच नगरे व्यवस्थीत, परीपूर्ण व तशीच होती असे म्हणता येणार नाही. कारण हे विदेशी पर्यटक भारतातील दूरवरच्या किंवा आतील भागातील नगरांमध्ये गेलेच असतील असे नाही. ते केवळ मोठया व राजधानीच्या नगरांमध्ये गेलेले असावेत. तशा नगरांशीच त्यांचा संबंध आला असावा त्यामूळे त्यांनी जे पाहिले व अनुभवले त्याचेच वर्णन त्यांनी केल्याचे दिसून येते.

तत्कालीन ऐतिहासीक साधनांचे, लिखाणाचे अवलोकन केल्यास नगर रचना, रस्ते, सर्वसामान्य निवास स्थाने, सर्व सामान्याची स्थिती याचा विचार केल्यास सर्वत्र एकसमान स्थिती नसल्याचे प्रत्ययास येते. अनेक ठिकाणी सोयी सवलतींचा, विकासाचा अभाव दिसून येतो. नगर रचनेतही दोष दिसून येतात. अर्थात नगर रचना ही व्यावहारीक गरजांच्या व तत्कालीन परिस्थितीचा विचार करून केल्याचेही दिसून येते. त्याकडे आधुनिक दृष्टीकोनातून पाहून निष्कर्ष काढणे किंवा त्याचे मूल्य ठरविणे योग्य होणार नाही. आजही आधुनिक काळातील नगरांची रचना, स्थिती प्रत्यक्षात अनुभवल्यास सर्व साधने, तंत्रज्ञान मदतीला असूनही रचनेत व व्यवस्थेत दोष दिसून येतात. नगरांचा विस्तार व स्वरूप हा चिंतेचा विषय बनला आहे. नगर रचनेबाबत भारताचा प्राचीन काळापासूनचा इतिहास वैभवशाली व अनुकर्नीय आहे. तो इतिहास व तंत्रज्ञान मध्ययुगीन भारतात नष्टप्राय झाला होता असे म्हणता येणार नाही. एवढे मात्र खरे की, या अध्ययनामूळे नवा मार्ग मिळत असतो. विकासातील दोष समजुन ते दूर करण्याचे मार्ग कळतात. त्यामुळे अधिक विकास करण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन प्राप्त होत असते. ते व्हावे यासाठी सदर शोधनिबंध सादर करण्याचा निर्णय घेतला. निश्चितपणाने तो उपयोगी ठरले ही अपेक्षा.

**तळटिपाः–**


1) नकवी एच. के. – अरबन सेन्टर एण्ड इंडस्ट्रीज इन अपर इंडीया, मुंबई, 1968, पृ. 20

2) राधेशाम – सल्तनत कालीन सामाजिक तथा आर्थिक इतिहास, अलाहाबाद, 1887, पृ. 9,10

3) अशरफ के. एम. – सोसायटी ॲण्ड कल्चर ऑफ मिडिवल इंडीया, दिल्ली, 1970, पृ. 203, 210

4) सरकार यदुनाथ – मुगल शासन पध्दती, आगरा, 1960, पृ. 189

5) नकवी एच. के. – पूर्व उल्लेखीत, पृ. 87, 90

6) फोस्टर डब्ल्यु. – अर्लो ट्रवल्स इन इंडिया, ऑक्सफोर्ड, 1921, पृ. 249

7) सिंह ओ. पी. – भारत का आर्थिक इतिहास, इलाहाबाद, 1977, पृ. 97

8) मॉरलॅण्ड डब्ल्यु. एच. – अकबर से औरंगजेब, दिल्ली, 1988, पृ. 274

9) नकवी एच. के. – पूर्व उल्लेखित, पृ. 87–90

10) सिंह ओ. पी. – पूर्व उल्लेखित, पृ. 98

11) नकवी – पूर्व उल्लेखित, पृ. 87–90

12) श्रीवास्तव ए. के. – उत्तर भारत का नगरीय आर्थिक जीवन, इलहाबाद, 1984, पृ. 1, 2
13) श्रीवास्तव आर्शिवादीलाल – मुगल कालीन भारत, आगरा, 1989, पृ. 234
14) भारव्दाज दिनेशचंद्र – मध्यकालीन भारतीय सभ्यता एवं संस्कृती, आगरा, 1990, पृ. 217
15) कित्ता – पृ. 217
16) कित्ता – पृ. 218